# पोलीस मनोरंजन केंद्र, पोलीस क्रिडा मैदान, सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल, पोलीस बँड, शामियाना इत्यादी आरक्षणाबाबतचे प्रपत्रक (Form)

| अ.क्र. | तपशील | अर्जदाराने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | |
| २ | अर्जदाराचा पत्ता (संपर्क दूरध्वनी क्रमांकासह) | |
| ३ | पोलीस मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल/पोलीस बँड/शामियाना मागणी कारण | |
| ४ | मागणी दिनांक ( पोलीस बँडसाठी वेळही नमूद करावी. ) | |
| ५ | पोलीस बँड पुरविण्यासाठीचा पत्ता | |
| ६ | अर्जदार सेवानिवृत्त असल्यास सेवानिवृत्तीचा दिनांक व ज्या ठिकाणाहून सेवानिवृत्त झाले त्या कार्यालयाचे नाव | |
| ७ | मयत पोलीस कर्मचा-यांचे कुटुबियांनी अर्ज सादर केला असल्यास खालील माहिती सादर करावी<br>१) मयत पोलीस कर्मचा-याचे नाव<br>२) मयत पोलीस कर्मचा-याचा हुददा<br>३) मयत दिनांक<br>४) अर्जदाराचे त्यांच्याशी असलेले नाते | |

# संमती पत्र

मी, श्री/श्रीमती ..........................................................................................
....................... प्रतिज्ञापूर्वक व स्वेच्छेने नमूद करतो/करते की, प्रपत्रकामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर व सत्य असून सदर प्रपत्रकामध्ये नमूद खालील सर्व सूचना, अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर माहिती खोटी आढळून आल्यास अथवा प्रपत्रकात नमूद सूचना/अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास जमानत रक्कम जप्त करण्याचे व कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार मी पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर यांना देत आहे.

# सूचना/अटी व शर्ती

१) मंजूर केलेले मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल/पोलीस बँड पथक/पोलीस शामियाना  अत्यंत निकडीच्या , कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या व खास बाबींसाठी सरकारी कामासाठी जेव्हा गरज असेल तेव्हा आरक्षित केले जाईल व अर्जदारास भाडे तत्वावर मंजूर केलेले आदेश रदद करण्यात येईल.
२) पोलीस मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल/पोलीस बँड पथक/शामियाना भाडे तत्वावर देण्याबाबतचे दर खालीलप्रमाणे आहेत.

## पोलीस मनोरंजन केंद्र-दर

| पोलीस अधिकारी/कर्मचारी नाव व पदनाम | भाडे रक्कम | अनामत रक्कम | सेवाकर १०.३०% | एकूण रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| पो.शि. ते पोलीस उप-निरीक्षक दर्जाचे पोलीस अधिका-यांसाठी | ११००० | ४००० | ११३३ | १६१३३ |
| सहायक पोलीस निरीक्षक त सहा.पोलीस आयुक्त दर्जाचे पोलीस अधिका-यांसाठी | १७००० | ५००० | १७५१ | २३७५१ |
| पोलीस उप आयुक्त व त्यावरील दर्जाचे पोलीस अधिका-यांसाठी | २०००० | ५००० | २०६० | २७०६० |
| खाजगी व्यक्तींसाठी | ३०००० | ५००० | ३०९० | ३८०९० |

## पोलीस बँड पथक- दर

| पोलीस अधिकारी / कर्मचारी नाव व पदनाम | पहिल्या तासासाठी | पुढील तासासाठी | वाहतूक चार्ज | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| पोलीस शिपाई ते पो.निरीक्षक व कार्यालयीन कर्मचारी | २,०००/- | १,०००/- | ५००/- | ३,५००/- |
| स.पोलीस आयुक्त व त्यावरील दर्जा पो.अधिकारी | ४०००/- | १०००/- | ५००/- | ५,५००/- |
| खाजगी व्यक्तीसाठी | १०,०००/- | २,०००/- | ५००/- | १२,५००/- |

## पोलीस शामियाना-दर

| पोलीस अधिकारी / कर्मचारी नाव व पदनाम | भाडे रक्कम | अनामत रक्कम | सेवाकर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| पोलीस कर्मचारी / पो.अधिकारी कार्यालयीन कर्मचारी | १,०००/- | १,०००/- | - | २,०००/- |
| खाजगी व्यक्तीसाठी | अनुज्ञेय नाही | | | |

## पोलीस क्रिडामैदान भाडेतत्वावर देण्याबाबतचे दर

| तपशील | मानधन | साफसफाई चार्जेस |
|---|---|---|
| खेळ (ज्याकरिता तिकिटांचा वापर नाही ) | रुपये १० हजार प्रतिदिन<br>रू.५ हजार अर्धा दिवस ( ६ तास)<br>रू. १ हजार प्रतितास | - |

## सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल-प्रतिदिन दर

| पोलीस अधिकारी / कर्मचारी नाव व पदनाम | भाडे | अनामत | एकूण रक्कम (रूपये) |
|---|---|---|---|
| पोलीस अधिकारी /कर्मचारी / कार्यालयीन कर्मचारी | २००/- | ५००/- | ७००/- |
| खाजगी व्यक्तीसाठी | १०००/- | ५००/- | १५००/- |
| पोलीस खात्याचे ऑफिशियल कामासाठी | ५००/- | - | ५००/- |

३) मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल/पोलीस बँड पथक/पोलीस शामियाना आरक्षित केलेल्या तारखेपासून तीन दिवसाचे आत भाडे व अनामत रक्कम रोखपाल पोलीस कल्याण निधीकडे जमा करून ती पावती पोलीस मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल/बँडमास्तर/शामियाना व्यवस्थापक यांना दाखवावी. संबंधित प्रभारी पोलीस अधिकारी/कर्मचारी/व्यवस्थापक यांनी त्यांचेकडे नोद घेतल्यानंतरच सदर मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल/पोलीस बँड पथक/पोलीस शामियाना संबंधितांना वापरण्यास मिळू शकेल अन्यथा सदर आरक्षण रदद झाल्यास त्याची जबाबदारी इकडील कार्यालयावर राहणार नाही.

४) पोलीस मनोरंजन केंद्राचे व्यवस्थापक अर्जदारास विदयुत मीटरचे युनिट तपासून ताबा देतील व त्याप्रमाणे युनिटचे पैसे महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाच्या युनिट दराप्रमाणे घेतील व सदरची रक्कम रोखपाल पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करतील. विदयुत खर्चासाठी वेगळी अनामत रक्कम दयावी लागणार नाही. परंतु अर्जदारानी केलेल्या जादा रोषणाईचा विदयुत खर्च त्यांचेकडून वसूल करण्यात येईल. तसेच विद्यत पुरवठा खंडित झाल्यास विनंतीनुसार जनरेटरव्दारे विद्युत पुरवठा प्रतितास रू.३५०/- भाडे आकारून पुरविण्यात येईल.सदर रक्कम अनामत रकमेतुन कपात करण्यात येईल.

५) मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल/पोलीस बँड पथक/पोलीस शामियाना चे भाडे एक दिवसासाठी म्हणजे त्या तारखेला सकाळी ०८.०० वा. ते रात्रौ २०.०० वा. पर्यंत असे धरण्यात येईल. त्यानंतरच्या प्रत्येक तासासाठी खाजगी व्यक्तीस रक्कम रुपये १०००/- व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना रक्कम रुपये ५००/- अतिरिक्त अदा करावे लागेल.

६) रात्रौ १०.०० नंतर पोलीस मनोरंजन केंद्रामध्ये/पोलीस क्रिडा मैदानावर/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल येथे ध्वनी क्षेपकाचा (Loud speaker) चा वापर करता येणार नाही.
७) पोलीस मनोरंजन केद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल येथे मदयपान करण्यास सक्त मनाई आहे. सदर प्रकार अथवा अन्य अयोग्य वर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल.
८) मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल ताब्यात देताना त्याची योग्यरीत्या साफसफाई न केल्यास/तोडफोड केल्यास अथवा लॉन/शामियाना खराबीसारखे प्रकार आढळून आल्यास संबंधित व्यवस्थापकाने दिलेल्या नुकसानीच्या अंदाज रिपोर्टमध्ये नमूद रक्कम अनामत रक्कमेतून कपात करण्यात येईल
९) मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल/पोलीस बँड पथक/पोलीस शामियाना आरक्षित केल्याच्या तारखेमध्ये बदल केल्यास अथवा आरक्षण रदद करावयाचे असल्यास आदेश मिळालेल्या तारखेपासून ८ दिवसाच्या आत कळविल्यास २५ टक्के व त्यानंतर ५० टक्के भाडयाच्या रक्कमेत कपात करुन उर्वरीत रक्कम संबंधितांना परत करण्यात येईल.
१०) पोलीस क्रिडा मैदानात कोणत्याही प्रकारची खोदाई करता येणार नाही. तसेच आवारातील झाडे-फुले इत्यादींची नासधूस होणार नाही याची दक्षता घ्यावी.
११) पोलीस क्रिडा मैदानासाठी वापरण्यात येणा-या विदयुत वापरापोटी मीटर रिडींगप्रमाणे स्वतंत्ररीत्या चार्जेस आकारण्यात येतील.त्यासाठी रु ५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार फक्त) प्रतिदिन अनामत रक्कम भरावी लागेल.
१२) ध्वनी वर्धकाचे नियमणास कायदयातील तरतुदी बंधनकारक राहतील. तसेच ध्वनी वर्धकाचा आवाज ७५ डेसीमल पेक्षा जास्त नासावा.
१३) सलग दोन दिवसापेक्षा जास्त दिवस पोलीस क्रिडा मैदानावर भाडे तत्वावर देण्यात येणार नाही.
१४) पोलीस मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल/पोलीस बँड पथक/पोलीस शामियाना इत्यादी दिवंगत पोलीस कर्मचा-यांच्या मुलामुलींना धार्मिक कार्यासाठी सवलतीच्या दरात देण्यात येईल. परंतु सेवानिवृत्त कर्मचा-यास ५ वर्षापर्यंत सवलतीच्या दरात व त्यानंतर खाजगी दराने देण्यात येईल. (सेवानिवृत्तीनंतर सवलतीच्या दरात हॉल/पोलीस बँड/शामियाना देताना सेवानिवृत्तीची तारीख ते आरक्षित कार्यक्रमाच्या तारखेपर्यंत पोलीस कल्याण निधीची नियमित वर्गणी थकबाकीसह आकारण्यात येईल)
१५) लग्न, मुंज व इतर धार्मिक कार्यासाठी पोलीस मनोरंजन केंद्र देताना त्यामध्ये पोलीस मनोरंजन केंद्र, पोलीस भोजन कक्ष व तेथील टेबल ,खुर्च्या इत्यादींचा समावेश असेल. सदर कार्यासाठी भांडी, लाऊड स्पीकर व लाईटींग इत्यादींची व्यवस्था संबंधित अर्जदारास स्वतः खाजगी व्यक्तीकडून करवून घ्यावी लागेल.
१६) पोलीस मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/सोमवार पेठ सांस्कृतिक हॉल/पोलीस बँड पथक/पोलीस शामियाना इत्यादी सवलतीच्या दरात देण्याबाबतचे नियम केवळ निधीचे सदस्य व त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी असतील. या प्रयोजनासाठी कुटुंब या संज्ञेचा अर्थ मुंबई नागरी सेवा नियम मधील नियम-१ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असेल. (पोलीस कल्याण निधी नियमावली क्रमांक पोमसं/२८/४९३७/पोकनि/४(२०४/५)/२००६ दिनांक १९.४.०६ मधील नियम क्रमांक ९ (१)(इ)(१)व (२) अन्वये)

**अर्जदाराची स्वाक्षरी व संपूर्ण नाव**

**सवलतीच्या दरात पोलीस मनोरंजन केंद्र/पोलीस क्रिडा मैदान/पोलीस बँड पथक/पोलीस शामियाना इत्यादीसाठी अर्जावर संबंधित पोलीस निरीक्षक यांची शिफारस असणे आवश्यक आहे.**
संबंधित पोलीस निरीक्षक यांचा अभिप्राय व स्वाक्षरी :-